**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1738/2007.**

श्री सुरेश केशवराव चौरसिया
418, मधुसुदन पी. के. साळवे,
मोहन नगर, नागपूर. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप आयुक्त प्रशासन
दुग्ध व्यवसाय विकास खाते सि फेस वरळी मुबई 18.
2) श्री पी. एन. भागवत
जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी
प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी
नागपूर विभाग, सिव्हील लाईन, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ..200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. त्यांचे तर्फे श्री पी. एन. भागवत प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी सुनावणीकरीता हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.2.2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी नागपूर विभाग यांचेकडे कालबध्द पदोन्नती व सेवा अंतर्गत प्रगती योजनेत काही लिपीक नि टंकलेखक यांना वेतन श्रेणी 4000–100–6000 देण्यात आलेली आहे. तर काही लिपीक नि टंकलेखक यांना 3200–85–4900 वेतन श्रेणी प्रादूविअ, नागपूर यांचे अधिपत्याखाली कर्मचा–यांना लागू केली आहे. सदर वे. श्रे. 4000–100–6000 व 3200–85–4900 देण्यात भेदभाव कां करण्यात आला. खात्याचे/ शासनाचे निर्देश असल्यास त्यांची प्रत तसेच श्री आर. बी कुडमेथे क. लिपीक व मला देण्यात आलेला कालबध्द पदोन्नतीचा इतिवृत्त कृपया पत्र उपलब्ध करुन देण्यात यावी. पुर्वी ज्या लिपीक नि टंकलेखकांना असुधारीत वेतन श्रेणी 1200–2040 सुधारीत 4000–6000 देण्यात आलेली आहे. त्यांना 3200–4900 वेतन श्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने मंजुर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे. काय? व करण्यात येत आहे काय? 1999 ते 2005 या संदर्भात कार्यालयानी आपले अभिप्रायासह वरील प्रमाणे आदेशाच्या प्रती. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.3.2007 रोजी लिपीक नि टंकलेखक या पदावरील कालबध्द पदोन्नती व सेवा अंतर्गत प्रगती योजनेतील लागू करावयाच्या वेतनश्रेणी बाबतचे प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे न्यायप्रविष्ट असल्याने मागविलेली माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देता येणार नाही असे प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी नागपूर विभाग, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 8.3.2007 रोजी उप आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या राज्य माहिती आयोगाकडे अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

1. श्री सुरेश केशावराव चौरसिया यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत या कार्यालयास दि. 14.2.2007 रोजीच्या अर्जान्वये कालबध्द पदोन्नती व सेवा अंतर्गत प्रगती योजनेत रु. 4000–6000 ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची माहिती/कागदपत्रे मागितली आहेत.
2. त्यावर दि. 6.3.2007 ला लिपीक नि टंकलेखक या पदावरील कालबध्द पदोन्नती व वेसा अंतर्गत प्रगती योजनेतील लागू करावयाच्या वेतनश्रेणीबाबतचे प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे न्यायप्रविष्ट असल्याने मागविलेली माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले आहे.
3. थोडक्यात प्रकरण काय आहे ?

खात्याचे दि. 30.8.1995 चे पत्रातील परिच्छेद 4 नुसार लिपीक/समय लेखक या संवर्गातील कर्मचा–यांना पदोन्नतीची वेतनश्रेणी म्हणून वरीष्ठ सहायकाची (रु. 1200–2040) वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्याने नागपूर विभागातील लिपीक तथा टंकलेखक यांना रु. 1200–2040 ही वेतनश्रेणी कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत लागू करण्यात आली. श्री कुळमेथे लिपीक नि टंकलेखक यांना दि. 5.3.1999 रोजी कालबध्द पदोन्नती देण्यासंबंधीच्या सभेत झालेल्या निर्णयानुसार दि. 6.4.99 च्या आदेशान्वये रु. 1200–2040 या वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला आहे. तद्नंतर खात्याचे दि. 9.4.1999 चे पत्रानुसार मुद्या क. 4 रद्य करण्यात येवून लिपीक आणि समय लेखक यांच्या जेष्ठतेबाबत विद्यमान शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करावी असे कळविले आहे. त्यामुळे श्री चौरसिया व इतर लिपीक तथा टंकलेखक यांना वेतनश्रेणी रु. 3200–4900 हि कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत लागू करण्यात आली आहे.
4. श्री नंदकिशोर गोहणे, श्री सुरेश चौरसिया व इतर 4 कर्मचा–यांनी रु. 3200– 4900 हि वेतनश्रेणी लागू केल्यामूळे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मुळ अर्ज क. 333/03 अन्वये याचिका दाखल केली होती. सदर याचिका दि. 11.10.2004 रोजी

न्यायाधिकरणाने कर्मचा–यांच्या बाजूने स्विकारण्यात आली. त्यास अनुसरुन शासनाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे रिट पिटीशन क्र. 3327/2005 दाखल केली असून त्यावर दि. 8.2.2006 रोजी "Rule Interim relief continued" असे निर्देशित केल्याचे सहा. सरकारी अधिवक्ता, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दि. 22.2.2006 चे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. व पुढील कार्यवाही न्यायालयाच्या स्तरावर प्रलंबीत आहे. त्यामूळे पूर्वी ज्या लिपीक नि टंकलेखकांना असुधारीत वेतनश्रेणी रु. 1200–2040 सुधारीत रु. 4000–6000 देण्यात आलेली आहे त्यात बदल करण्यात आलेला नाही.

5. प्रस्तूत प्रकरण हे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे प्रलंबीत असल्याने अर्जदारास याबाबतची माहिती/कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच मागणी केलेली कागदपत्रे ही महाराष्ट्र माहितीचा अधिकार 2005 मधील नियम 8 (झ) नुसार अधिका–यांच्या विचारविमर्शाचे अभिलेख असल्याने उपलब्ध करुन देणे उचित ठरणार नाही.

परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली दिसून येते ती माहिती त्यांच्या स्वतःच्या तसेच सर्वसाधारण संवर्गाच्या संदर्भात त्यांनी मागितलेली दिसून येते त्या संदर्भामध्ये जे उत्तर देण्यात आलेले आहे त्या मध्ये न्यायालयाने सदरची माहिती प्रकट करण्यात येवू नये अशा प्रकारच्या आदेशाचा उल्लेख नाही त्यामुळे एखादे प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर जोपर्यंत मा. न्यायालय ती माहिती प्रकट करु नये असा आदेश देत नाही तोपर्यंत ती माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देणे बंधनकारक असते. त्याचप्रमाणे खुलाशामध्ये अधिनियमाच्या 8 (झ) प्रमाणे अधिका–यांच्या विचारविमर्शाचे अभिलेख असल्याने माहिती उपलब्ध करुन देणे उचित ठरणार नाही असे जे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे त्याबाबत 8 (1)

(झ) याबाबत तपासून पाहणे आवश्यक ठरेल. अधिनियमाच्या कलम 8 (1) (झ) मध्ये मंत्रालयाचे कागदपत्रे तसेच मंत्रीपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविमर्शाचे अभिलेख अशा प्रकारची माहिती ही प्रकट करण्यास अपवाद केलेला आहे. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये अधिका–यांच्या विचारविमर्शाचे अभिलेखाचा उल्लेख करण्यात आलेला आहे परंतु कर्मचा–याच्या पदोन्नतीच्या संदर्भात आहे. मंत्रालयाची कागदपत्रे तसेच मंत्रीपरिषद यांचेकरीता तयार केलेल्या टिपणीच्या संदर्भात नाही. मंत्रीपरिषदा करीता जर सचिवांनी, अधिका–यानी टिपणी तयार केलेल्या असतील तर त्या प्रकरणातील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ही माहिती सुध्दा उपलब्ध करुन देणे बंधन कारक असते. सदरच्या प्रकरणात तर कलम 8 (1) (झ) याचा आधार घेता येणार नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे हे योग्य दिसून येत नाही. वरील सर्व कारणांमुळे अपीलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे हे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय हे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी अभिप्रायासह आदेशाच्या प्रती अभिप्रायासह उपलब्ध करुन द्याव्यात अशी जी मागणी केलेली आहे त्याबाबत आदेशाच्या प्रती व त्याकरीता असलेल्या टिपणीच्या प्रती उपलब्ध करुन देणे उचित होईल. अभिप्राय नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दाखल केलेलेच झालेले नाही असे शिरीश विरकर अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन) यानी आयोगास केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल करतांना स्पिड पोस्टनी दाखल केलेले आहे व त्याकरीता त्यांनी पोस्टाचा पुरावा तसेच लिपीक आयुक्त दुग्ध विकास यांनी दिलेली पोच असलेली पावती दाखल केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष अर्ज सादर केल्याची पोच सुध्दा त्यांनी दाखल केल्याचे दिसून येते. हयावर प्रथम अपील हे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले होते हा निष्कर्ष काढावा लागतो व त्याबाबत

जर प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे कार्यालयातून उपलब्ध सर्व नोंदी मध्ये दाखल केलेल्या अपीलाची नोंद झालेली नसेल तर त्या कालावधीतील किंवा त्या दिवसाच्या लिपीक यांनी पोच दिलेली होती त्या लिपीकाच्या संदर्भामध्ये विभागीय चौकशी करुन कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. जेणेकरुन भविष्यात देणारा लिपीक आलेले अर्ज दाखल करुन घेण्याची जबाबदारी पार पाडतील. जन माहिती अधिकारी यांनी जे कारण दिलेले आहे ते अर्थातच त्यांनी प्रकरणातील सर्व घटनाक्रम व दाखल झालेले न्यायालयीन प्रकरण यांचा विचार करुन दिलेले असल्यामुळे सद्‌भावनेने दिलेले आहे असा निष्कर्ष काढणे क्रमप्राप्त ठरते. परंतु अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्या दि. 14.2.2007 च्या अर्जाप्रमाणे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये संपूर्ण इतिवृत्ताच्या व टिपणीच्या छायांकीत प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील दि. 13.3.2006 रोजीच्या लिपीक यांनी पोच दिलेली दिसून येते परंतु लिपीकाच्या संदर्भामध्ये चौकशी करण्यात येवून योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 10.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.